मी सुरेखा (बर्डे) टाकसाळ 1964 ची बॅच आणि माझी बहिण प्रतिभा (बर्डे) टिळक 1966 ची बॅच, आम्हाला ग. ग. हायस्कूलमध्ये शिकण्याची संधी दिल्याबद्दल सर्वप्रथम मी माझ्या आई-वडिलांचे आभार मानते.

भलामोठा सेंट्रल हॉल असलेली ग.ग. ची प्रशस्त देखणी इमारत ! मला आठवते आम्ही अकरावीत होतो. काही कारणाने त्यावर्षी शाळा गॅदरिंग आयोजित करणार नव्हती. आमच्या वर्गाने पुढाकार घेतला. गटा गटांच्या स्पर्धा-मनोरंजनाचे कार्यक्रम, मेकअप चे साहित्य, बक्षिसे व त्यांचे पॅकिंग येथपासून ते सेंट्रल हॉल मधील स्टेज सजवण्या पर्यंत सर्वकाही आमच्या वर्गाने केले. उशिरापर्यंत शाळेत थांबून स्टेज चे काम करत असताना, सौ. बेदरकर बाईंनी स्वतःच्या घरून आमच्यासाठी डबे भरून कांदे पोह्याचा श्रमपरिहार पाठवला होता. आमच्या मेहनतीची दखल घेतली होती. शाळेला पोहोचण्यासाठी उशीर झाला तर शाळेला चकरा मारण्याची, भाजीच्या वाफ्यामध्ये काम करण्याची शिक्षा असे. पिटी, खोखो, हुतुतू बरोबरच बेसबॉल खेळण्याची सोय होती. प्रथम एसीसी नंतर एन डी एस या दोन्हीसाठी आम्हाला शाळेतर्फे पोलीस परेड ग्राउंड वरील परेड मध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. वसंत-ग्रीष्म...... अशा सहा ऋतूंच्या सहा गटांद्वारे५ वी ते ११ वी पर्यंत विविध स्पर्धा होत असत.

आमच्या वर्गाला आठवीपासून इंग्रजी विषय सुरू झाला. एका हातात पेन आणि दुसऱ्या हातात पेन्सिल धरून,This is a pen,This is a pencil. असे प्रात्यक्षिक -कृती, इंग्रजीच्या बाई आमच्याकडून करून घेत असत. Parrot is green, it has red beak अशी इंग्रजी शब्द आणि भाषेची ओळख आम्हाला करून दिली जायची. का कोण जाणे इंग्रजी चे दडपण माझ्या मनावर खूप वर्षे राहिले.

आमच्या वर्गातील आम्हा काहीजणींना क्रिकेटच्या मॅचेस मध्ये खूप इंटरेस्ट होता. कसोटी सामन्यांची कॉमेंट्री त्यावेळी रेडिओवर यायची. शाळेतला रेडिओ टीचर्स रूम शेजारच्या अर्ध्या भागात होता. काहीतरी निमित्त करून आमच्यातली एखादी तेथे जायची आणि ताजा स्कोअर ऐकून गुपचूप वर्गात शिरायची आणि किती आऊट, किती रन्स, कोण किती वर खेळतोय हा तपशील कागदाच्या कपट्यावर मग पुढे "पास ऑन" होत असे.
शाळेत आम्ही मजा खूप केली. वर्गात चोरून कादंबऱ्याही वाचल्या. खोड्या केल्या. शिक्षकांच्या नकला केल्या-मी तर या नकलांबद्दल गाडगीळ बाईंची बोलणीही खाल्ली होती,

संक्रांतीच्या दिवशी गावभर फिरून काही टीचर्स च्या घरी तिळगुळाचे लाडू देखील खाल्ले. एक मात्र खरे शाळेने, सर्व शिक्षिकांनी आम्हाला खूप काही दिले. आमचा वात्रटपणाही सहन केला. प्रसंगी आम्हाला समजही दिली. त्यावेळी ते सर्व समजलेच असे नाही. पण पुढे आयुष्याच्या प्रवासात शाळेतील ते सर्व संस्कार, विचार, शिकवण आणि कलाकौशल्य यांची शिदोरी आम्हाला नेहमीच सोबत, ताकद आणि हिम्मत देत आली आहे.

एक प्रसंग आठवतो आहे.

शाळेत सायन्स ची लॅबोरेटरी तळमजल्यावर होती . सिधये सर आम्हाला सायन्स शिकवत. शिपाई केरू या लॅब मध्ये असायचा. सायन्स च्या वर्गात शिरताच दारा जवळच्या कोपऱ्यात एक मानवी सांगाडा टांगलेला होता . काही जणी त्या बाजूला बघण्याचे देखील टाळत. एकदा सिधये सर आम्हाला सोडियम चे गुणधर्म शिकवत होते, टेबलावर दोन बीकर ठेवले होते. एका मध्ये पाणी होते. "सोडियम चा पाण्याबरोबर संपर्क येताच तो पेट घेतो. म्हणून तो कधी पाण्यात

ठेवायचा नाही," असे एकीकडे सिधये सर आम्हाला सांगत असतानाच "धडाम "असा प्रचंड आवाज झाला. संपूर्ण वर्ग हादरला, सिधये सर देखील. सरांनी सोडियम चा तो तुकडा अनावधानाने पाण्यात टाकला होता! आम्हा सर्व जणींच्या चेहऱ्यावर एकाच वेळी भीती होती आणि आणि सरांच्या त्या प्रात्यक्षिका मुळे हसू आवरत नव्हते . शाळेत जीवाभावाच्या मैत्रिणी मिळाल्या. आजही ती मैत्री टिकून आहे. गव्हर्मेंट गर्ल्स स्कूल चे ते सुखद, सुंदर दिवस सरले. आम्ही बहुतेक जणी चार वर्षांनी ग्रॅज्युएट झालो आणि आपापल्या मार्गाला लागलो. मी थोडा वेगळा मार्ग निवडला. हट्टाने जर्नालिझम चा कोर्स केला. पत्रकार झाले. सुरुवातीला नाशिक मध्ये दैनिक देशदूत मध्ये, त्यानंतर पुणे आकाशवाणी केंद्रात काम केले. पती देखील पत्रकारच निवडला. आकाशवाणीतील नोकरी सोडली. पती विनोद टाकसाळ बरोबर मॉस्को (रशिया) मध्ये साडेसहा वर्षे रहायची संधी मिळाली. अगदी कोऱ्या पाटीने, त्याकाळचे पोलादी पडद्याआडचे जीवन अनुभवले. तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील राजकीय घडामोडी देखील पहायला मिळाल्या. भारताचा पहिला अंतराळवीर राकेश शर्मा आणि त्यांचा सहकारी रवीश मल्होत्रा यांच्याबरोबर भेटी झाल्या.

रशियातील वास्तव्यानंतर 1985 मध्ये आम्ही दिल्लीला परतलो. तेव्हापासून आमचा मुक्काम दिल्लीतच आहे. आमच्या दोन्ही मुलांचा शाळेचा प्रवास सुरू होताच मी पुन्हा पेन हाती घेतले. वीस वर्षे देशाच्या राजधानीतून "सकाळ "वर्तमानपत्राची प्रतिनिधी म्हणून काम केले, आणि आजही पत्रकाराच्या भूमिकेत मी आहे. पत्रकार म्हणून काम करताना आलेले अनुभव सर्वार्थाने रोमांचक, रोमहर्षक असेच आहेत. येथे प्रत्येक दिवस हा वेगळा असतो. वेगळी माणसे, वेगवेगळ्या घटना घडामोडींनी भरलेला प्रत्येक दिवस नवा अनुभव, प्रसंगी नवा धडा ही शिकवून जातो. पत्रकारितेचा माझा प्रवास मला आगळा आनंद देत आला आहे.

या पत्रकारितेने मला धनसंपदा नाही दिली कदाचित. परंतु अनुभव समृद्धी व आत्मिक समाधान मात्र खचितच दिले. समाजातील विविध क्षेत्रातील सामान्य व असामान्य अशा व्यक्तीं बरोबर गाठीभेटी झाल्या. त्यांचे जीवन जवळून न्याहाळता आले. त्यापासून काही बोध घेता आला. ही ज्ञानसंपदा माध्यमाद्वारे समाजातील इतरांपर्यंत पोहोचवता आली. हे करत असताना राजकीय खेळी हेवेदावे, शह- काटशह अगदी जवळून पाहायला मिळाले. संसदेत सरकारे पडताना पाहिले व नवी सरकारे उभारताना बघितली. विद्वान, गुणवंत, मुत्सद्दी कलाकार, सैनिक यांना जवळून पाहता आले व समजता आले. तळागाळातील उपेक्षित, शोषित वंचितांचे जीवन, दैन्य न्याहाळता आले आणि देशाचे नेतृत्व करणारे राजीव गांधी,नरसिंह राव,अटल बिहारी वाजपेयी, इंद्रकुमार गुजराल, आणि नरेंद्र मोदी या पंतप्रधानांबरोबर प्रत्यक्ष संवाद साधायचीही संधी मिळाली.

स्वातंत्र्य सेनानी अरुणा असफ अली, कवयित्री अमृता प्रीतम, विजयाराजे सिंधिया, सूर सम्राज्ञी लता मंगेशकर-आशा भोसले, हवाई दलातील वरिष्ठ अधिकारी डॉक्टर पद्मा बंडोपाध्याय, सुषमा स्वराज, सुमित्रा महाजन इत्यादीं बरोबर संवाद साधता आला. त्यांचे विचार, मते समजावून घेता आली. राजनैतिक मुत्सद्दी पी .एन. हक्सर, मधु लिमये, जॉर्ज फर्नांडिस, मधु दंडवते, शरद पवार, डॉक्टर माशेलकर, बिरजू महाराज अशा दिग्गजांबरोबर वार्तालाप करता आला. सरकार दरबारच्या शाही भोजनांचा आस्वाद घेता आला. तर कधी बातमीचा एक तुकडा मिळवण्यासाठी पाण्याविना रस्त्यावर तासंतास उभे राहण्याचा प्रसंग देखील आला. डोळ्यात तेल घालून अहोरात्र आपल्या देशाच्या सीमेचे कणखरपणे रक्षण करणाऱ्या सैनिकांबरोबर काही वेळ घालवता आला. नवी दिल्ली रेल्वे स्टेशन आणि संसद भवनावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यांची मी प्रत्यक्ष दर्शी झाले.

दिल्ली मराठी पत्रकार संघाने"जीवन गौरव" पुरस्कार देऊन माझ्या कामाची दखल घेतली.

गेली 33 वर्षे दिल्लीमध्ये मी  पत्रकार म्हणून काम करीत आहे. इतर राज्यातीलही काही महिला पत्रकार येथे कार्यरत आहेत परंतु नाशिक आणि संपूर्ण महाराष्ट्रातूनही पूर्णवेळ दिल्लीत काम करणारी मी पहिली महिला पत्रकार आहे व ती ग. ग. हायस्कूलची विद्यार्थिनी आहे याचा मला अभिमान वाटतो.

हे साहित्य सर्वस्वी माझे आहे.या सहित्यास व फोटो ईत्यादि मजकूरास ग. ग. संबंधी व्हॉटसअप ग. ग. ग्रुप, ब्लॉग, फेसबुक तसेच स्मरणिकेत प्रसिद्ध करण्यास मी खुशीने संमती देत आहे.

नाव : पूर्वाश्रमीचे - सुरेखा बर्डे

विवाहानंतर चे - सुरेखा विनोद टाकसाळ

६०६,लिंक अपार्टमेंट्स,

१८, आय.पी. एक्स्टेन्शन

दिल्ली.११००९२
मोबाईल क्र :09818723733

